लोकमत

# १०,७४६ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च- एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु असून शुक्रवारी बी.टेक, एमएस्सी, एम.कॉम यासह २१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. .

कोल्हापूर जिल्ह्यात ६ , सांगली व सातारा जिल्ह्यात प्रत्येकी दोन कॉपीचे प्रकार आढळून आल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

पुढारी

# विद्यापीठ पदवी परीक्षेला १० हजार विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षेला शुक्रवारी १० हजार ७४६ विद्यार्थी उपस्थित होते. भरारी पथकाकडून ११ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे. विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत शुक्रवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ कॉमर्स, बॅचलर ऑफ ॲग्रीकल्चर, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बी.एस्सी., एम.एस्सी. नॅनो सायन्स टेक्नॉलॉजी, मास्टर बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ सोशल वर्क, मास्टर ऑफ रूरल स्टडीज आदी २१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे झाल्या आहेत.